# कट प्रॅक्टिसला शिक्षा

## किमान पाच हजारांचा दंड, तीन महिन्यांचा कारावासही?

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

वैद्यकीय क्षेत्राला लागलेली कट प्रॅक्टिसची कीड उपटून काढण्यासाठी राज्यात कट प्रॅक्टिसविरोधी कायदा लागू करण्याचा प्रस्ताव असून, त्यासंदर्भातील पहिल्या मसुद्यातील महत्त्वाचे टप्पे शनिवारी विशेष समितीच्या बैठकीत निश्चित झाले. कट देणारा व घेणारा अशा दोघांनाही या कायद्यान्वये किमान पाच हजार रुपये दंड तसेच तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल, असे या प्राथमिक मसुद्यामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.



- डॉक्टर आणि संबंधित संस्था अशा दोन्ही घटकांना कट प्रॅक्टिससाठी शिक्षेची तरतूद असेल.
- डॉक्टरला तीन महिन्यांचा कारावास आणि पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल. पुन्हा कट प्रॅक्टिस केल्यास २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल.

डॉक्टर, वैद्यकीय शिक्षणसंस्था, वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्या घटकांसह रुग्णालयांचा जनसंपर्क करणाऱ्यांनीही कट देण्या-घेण्याचा प्रयत्न केल्यास कायद्याचा बडगा उगारण्यात येणार आहे. कायद्याचा मसुदा समितीतर्फे हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारला सादर केला जाणार आहे.

बारा वर्षांपूर्वी डॉ. हिंमतराव बावस्कर यांनी कट प्रॅक्टिसविरुद्ध दंड थोपटले. ही प्रॅक्टिस मोडून काढण्यासाठी काही दिवसांपूर्वी एशिअन हार्ट इन्स्टिट्यूटनेही ठाम भूमिका घेतली. कट प्रॅक्टिसविरोधी कायद्याचा मसुदा तयार करणाऱ्या समितीमध्ये डॉ. बावस्कर यांचा समावेश आहे. या कायद्यात डॉक्टरसह संस्थेलाही शिक्षेची तरतूद असणार आहे, असे त्यांनी 'मटा'ला सांगितले.

डॉक्टर आणि संबंधित संस्था अशा दोन्ही घटकांना कट प्रॅक्टिससाठी शिक्षेची तरतूद असेल. डॉक्टरला तीन महिन्यांचा कारावास आणि पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल. शिवाय, पुन्हा कट प्रॅक्टिस केल्यास डॉक्टरकडून २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असे समितीद्वारे राज्य शासनाला सुचविले असल्याचे डॉ. बावस्कर यांनी सांगितले. कट प्रॅक्टिसविरोधातील जगभरातील कायद्यांची पडताळणी आणि शिक्षेच्या तरतुदींच्या अभ्यास करण्याचे कामही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीत डॉ. बावस्कर यांच्यासह समितीमधील राज्याचे माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित, केईएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे, डॉ. संजय ओक, एशियन हार्ट इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष डॉ. रमाकांत पांडा, इंडियन मेडिकल असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. यापूर्वी केवळ डॉक्टरांवरच कट खाल्ल्याचा आरोप होत होता. मात्र, या कायद्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील कट प्रॅक्टिस देणारी व घेणारी प्रत्येक कडी निखळून काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसे झाले तर आरोग्यसेवा सर्वसामान्यांसाठी सुसह्य होतील, असे समितीमधील सदस्यांचे मत आहे.

> कट प्रॅक्टिसची कीड ही आरोग्यक्षेत्रातील प्रत्येक घटकाला लागलेली आहे. युनानी, आयुर्वेद, होमिओपथी, फिजिओथेरपी, रेडिओलॉजी सेंटर, रुग्णालये अशा सगळ्याच ठिकाणी वेगवेगळ्या कारणांनी कट दिली-घेतली जाते, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. येत्या दोन आठवड्यांत दंडात्मक तरतुदीच्या संदर्भात कडक आणि ठोस निर्णय घेण्यात येणार आहे.
>
> -डॉ. रमाकांत पांडा, कट प्रॅक्टिसविरोधातील समितीचे सदस्य

## फास्ट न्यूज

### अकरावी प्रवेशाची आज पहिली यादी



मुंबई : अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठीची पहिली गुणवत्ता यादी आज, सोमवारी प्रसिद्ध होणार आहे. यंदा १०० टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने पहिल्या यादीचा कट ऑफ गेल्यावर्षीच्या तुलनेत दोन ते तीन टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.

>> वृत्त...३

### डोकलाममध्ये लष्कराचे ठाण

नवी दिल्ली: भूतानजवळील डोकलाम भागावरून चीनची अडेलतट्टू भूमिका कायम असतानाच, भारतीय लष्करानेही या भागामध्ये दीर्घकाळ ठाण मांडण्याची तयारी केली आहे. या लष्कराच्या तुकड्यांना रसदपुरवठा व्हावा, यासाठी यंत्रणा तयार करण्यात आली आहे.

>> वृत्त...१२

### कट प्रॅक्टिसला शिक्षा



मुंबई : वैद्यकीय क्षेत्राला लागलेली कट प्रॅक्टिसची कीड उपटून काढण्यासाठी राज्यात कट प्रॅक्टिसविरोधी कायदा लागू करण्याचा प्रस्ताव असून, कट देणारा व घेणारा अशा दोघांनाही या कायद्यान्वये किमान पाच हजार रुपये दंड तसेच तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा देण्याचे प्रस्तावित आहे.

>> वृत्त...२